www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118



■ मुख्यमंत्री येती शहरा, आधी रस्ते दुरुस्त करा

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ लांब पल्ल्याच्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरूवार,१४ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## आपली लढाई महाविकास नव्हे तर महाअडाणी आघाडी विरोधात; योगी आदित्यनाथ यांनी सुनावले खडेबोल

● ठाणे, यश सावंत :



जातीच्या नावावर वाटण्या करणाऱ्या काँग्रेसने १९४७ पासून देशासोबत विश्वासघात केला. काँग्रेसचे अस्तित्व आता संपवण्याची वेळ आली आहे, असा हल्लाबोल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व भाजप नेते योगी आदित्यनाथ यांनी बुधवारच्याच्या सभेत केला. मीरा भाईंदर येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी सायंकाळी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर मीरा भाईंदर मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता आणि ओवळा माजीवडा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रताप सरनाईक तसेच घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

'बटेंगे तो कटेंगे' असा नारा देत योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांचा समाचार घेतला. योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, महाराष्ट्र ही संत, महापुरुषांची पुण्यभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांना एकत्रित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. भारतासाठी ते सदैव प्रेरणादायी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळगंगाधर टिळक, बाजीराव पेशवे यांनी आदर्श घडवला. त्यांच्या प्रेरणेतून देश व समाजासाठी कार्य केले जात आहे.

माझ्यासाठी देश व सनातन धर्माशिवाय दुसरे काही नाही. ते पुढे म्हणाले की, १९४७ पासून निरंतर सत्ता चालवण्याची संधी काँग्रेसला मिळाली होती. मात्र, काँग्रेसने देशासोबत धोका केला. अखंड भारताचे तुकडे केले. आता काँग्रेस अध्यक्ष खरगे माझ्यावर राग व्यक्त करीत आहेत. माझ्यापेक्षा हैदराबादच्या निजामावर त्यांनी राग काढावा. माझ्यासाठी देश व सनातन धर्माशिवाय दुसरे काही नाही. निजामाच्या अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम काँग्रेस करीत आहे, असा आरोप योगी आदित्यनाथ यांनी केला.

पान २ वर

## 'एखादी व्यक्ती गुन्ह्यातील आरोपी म्हणून त्याच्या मालमत्तेवर बुलडोझर चालवणे हे घटनाविरोध' -सर्वोच्च न्यायालय

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



सर्वोच्च न्यायालयाने अतिक्रमणविरोधी कारवाईसंदर्भात अंतिम निकाल दिला असून नियमावलीही घालून दिली आहे. एखादी व्यक्ती गुन्ह्यातील आरोपी आहे म्हणून त्या व्यक्तीच्या मालमत्तेवर बुलडोझरने पाडकाम करणं हे घटनाविरोधी असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिला. राजस्थान व मध्य प्रदेशमधील अशा प्रकारच्या कारवायांविरोधात दाखल याचिकांवर सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने बुधवारी निकाल दिला. यावेळी अशी कारवाई घटनाविरोधी ठरवतानाच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्याला त्यासाठी दोषी धरलं जावं, असंही न्यायालयाने यावेळी नमूद केलं. न्यायमूर्ती बी. आर. गवई व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.

सर्वोच्च न्यायालयाने यावेळी अशा कारवाया केल्या जाऊ नयेत असं सांगतानाच कोणत्याही अतिक्रमणविरोधी कारवाईवेळी प्रशासनाने कोणत्या गोष्टींचं पालन करायला हवं, याची नियमावलीच आखून दिली. त्यानुसार, काही गोष्टी प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाला बंधनकारक करण्यात आल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमावलीमध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

१. कोणत्याही बांधकामाविरोधात पाडकामाचे आदेश दिले असतील, तर त्याविरोधात दाद मागण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जाणं आवश्यक आहे.

२. कोणत्याही पाडकामाला कारणे दाखवा नोटिशीशिवाय परवानगी नाही. ही नोटीस नोंदणीकृत पोस्टाद्वारे पाठवली जावी आणि संबंधित मालमत्तेवर ती चिकटवली जायला हवी.

३. नोटीस जारी केलेल्या दिवसापासून १५ दिवस आणि नोटीस दिल्याच्या दिवसापासून ७ दिवसांचा कालावधी पुढील कोणत्याही कारवाईपूर्वी दिला जायला हवा.

४. या नोटीसमध्ये कोणत्या कारणांमुळे संबंधित मालमत्ता अतिक्रमित ठरवण्यात आली, त्याचा सविस्तर उल्लेख आवश्यक आहे. त्याशिवाय, कोणत्या प्राधिकरणासमोर किती तारखेला याबाबतची प्रत्यक्ष सुनावणी होईल, हेदेखील नोटीसमध्ये नमूद असायला हवं.

५. नोटीस दिल्यानंतर सदर कारवाईबाबतची पूर्वसूचना जिल्हाधिकाऱ्यांना देणं आवश्यक आहे.


६. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या संपूर्ण कारवाईचं व्यवस्थापन करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

७. पाडकामासंदर्भातील नोटीस व त्याबाबतचे आदेश एका ठराविक अशा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावेत.

पान २ वर

## 'पक्ष निर्माण करायला अक्कल लागते, फोडायला नाही...'- शरद पवार

● पुणे, अभिजित येरल्लू :



पक्ष निर्माण करायला अक्कल लागते, पक्ष फोडायला अक्कल लागत नाही, असं म्हणत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. आज अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे प्रचारसभेत बोलताना शरद पवार यांनी पक्षफोडीच्या राजकारणावरून मिंधे आणि फडणवीस यांच्यावर कडाडून टीका केली आहे. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले आहेत की, एकनाथ शिंदे यांनी ३० ते ४० आमदारांना सोबत घेऊन गुवाहाटीला जाऊन बसले. शिंदे हे देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे या दोघांच्याही मंत्रिमंडळात होते. असं असतानाही त्यांनी पक्ष फोडण्याची भूमिका घेतली. लोकांना हे पटलेलं नसून देवेंद्र फडणवीसांनी सगळ्यात मोठं काम काय केलं? असं विचारलं असता ते पक्ष फोडला म्हणून सांगतात.

पान २ वर

## मुंबईतील वैद्यकीय महाविद्यालयांबरोबर उपनगरीय रुग्णालयांमधील ४ महिने परिचारिका वेतनाविना

● मुंबई, धनश्री सट्टा :



महानगरपालिकेच्या केईएम, शीव, नायर आणि कूपर या वैद्यकीय महाविद्यालयांबरोबर उपनगरीय रुग्णालयांमधील परिचारिकांची अपुरी संख्या लक्षात घेऊन पालिकेने जूनमध्ये ६०० परिचारिकांची कायमस्वरुपी भरती केली. मात्र प्रशासनाने चार महिन्यांपासून या परिचारिकांना वेतनच दिलेले नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

पालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये असलेल्या परिचारिकांच्या कमतरतेमुळे रुग्णसेवेवर परिणाम होत असे. करोना काळामध्ये हा परिणाम अधिक प्रकर्षाने जाणवला. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालये व उपनगरीय रुग्णालयांमध्ये परिचारिकांची भरती करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला. प्रशासनाने आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करून जूनमध्ये विविध रुग्णालयांमध्ये ६०० परिचारिकांची भरती केली. परिणामी, पूर्वी कार्यरत असलेल्या परिचारिकांवरील कामाचा ताण कमी झाला. मात्र मागील चार महिन्यांपासून मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नव्याने कायमस्वरुपी भरती केलेल्या ६०० परिचारिकांना वेतनच दिलेले नाही. चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे या परिचारिकांनी प्रशासनाकडे विचारणा केली असता त्यांचा कर्मचारी क्रमांक तयार झाला नसल्याचे तांत्रिक कारण देण्यात आले. तसेच पुढील दोन महिने वेतन होईल की नाही याची शाश्वतीही नसल्याचे परिचारिकांकडून सांगण्यात येत आहे. कर्तव्यावर रूजू झाल्यानंतर सलग चार महिने वेतन मिळू न शकल्याने परिचारिकांची आर्थिक स्थिती बिकट बनली आहे.

पान २ वर

## अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या उद्धव ठाकरेंवर कारवाई करा; नितेश राणेंची मागणी

● सिंधुदुर्ग, दिगंबर जाधव :



मविआचे अधिकृत उमेदवार संजय देरकर यांच्या प्रचारार्थ यवतमाळमध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे वणी येथे पोहचताच त्यांच्या हेलिकॉप्टरची आणि बॅगची तपासणी करण्यात आली. त्यानंतर उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांचे अपॉइंटमेंट लेटर मागितले होते. त्यावर आता भाजपा नेते नितेश राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरेंनी अधिकाऱ्यांचे अपॉइंटमेंट लेटर मागितले यावरून निलेश राणेंनी ठाकरेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवडणुकीच्या काळात आचारसंहिता असल्यामुळे सर्व नेत्यांच्या बॅगा तपासल्या जात आहेत. मग उद्धव ठाकरे इतकी नाटके का करत आहेत ? असा सवाल नितेश राणेंनी विचारला आहे. जो नियम अन्य लोकप्रतिनिधी ना, तोच नियम ठाकरेंना लागणार असल्याचे ते म्हणाले आहेत. तसेच मंगळवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या देखील बॅगांची तपासणी करण्यात आली तेव्हा फडणवीसांनी इतका थयथयाट केला नसल्याचे यावेळी ते म्हणाले आहेत. उद्धव ठाकरे काल (मंगळवार) निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना धमकावत होते, असेही त्यांनी यावेळी सांगितले आहे.

तसेच अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या या प्रकरणावरून उद्धव ठाकरेंवर कारवाई करा, अशी मागणी भाजपा प्रवक्ते आमदार नितेश राणे यांनी केली आहे. तसेच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना क्लीन चिट दिली नाही, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार हे भ्रष्टाचारी होते. त्यामुळे उद्धव ठाकरेंसह महाविकास आघाडीच्या नेत्यांचा बुरखा या अहवालाने फाडला आहे. तसेच आता यावर उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांनी आपली प्रतिक्रिया द्यावी असे नितेश राणे म्हणाले आहेत.

दोन दिवसापूर्वी यवतमाळमधील वणी येथे उद्धव ठाकरे हे हेलिकॉप्टरमधून प्रचार सभेसाठी गेले होते. तेव्हा, हेलिकॉप्टरमधून उतरताच निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांची बॅग तपासली. तोच प्रकार मंगळवारी लातूरमधील औसा येथे घडला. औसातही आयोगाच्या अधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांची बॅग तपासली. दोन्हीवेळी उद्धव ठाकरे यांनी तपासणीचा व्हिडीओ काढत अधिकाऱ्यांना चांगलंच फैलावर घेतलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगा तपासल्या का? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी अधिकाऱ्यांना विचारल्याचे पाहायला मिळाले.

## शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन प्रचार

● रायगड, विशाल पाटील :




विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या उमेदवारांचा जोरदार प्रचार सुरु आहे. सर्वांच्या भेटी घेऊन मतदारांना मत देण्याचे आवाहन करत आहे. दरम्यान प्रचार करण्यास सरकारी कार्यालयात जाण्यास मनाई असताना शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन प्रचार केल्याप्रकरणी त्यांच्या आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या नियमावलीनुसारच प्रचार करणे बंधनकारक आहे. अर्थात प्रचार करताना आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने प्रचाराचा कालावधी व वेळ ठरवून देण्यात आली आहे. तसेच सरकारी कार्यालयात प्रचार करण्यास देखील बंदी आहे. असे असताना देखील अलिबागमध्ये शेकापच्या उमेदवाराने सरकारी कार्यालयात जाऊन आपला प्रचार केला आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्या विरोधात आचार संहिताभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आलाय.

पान २ वर

## हेलिकॉप्टरमधील बॅगांची तपासणी निष्पक्षपणेच : निवडणूक आयोग

● मुंबई, विशाल कारंडे :




हेलिकॉप्टर तपासणीवरून राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली असतानाच निवडणूक आयोगाने मात्र निष्पक्ष तपासणी होत असल्याचे म्हटले आहे. राजकीय नेते आणि स्टार प्रचारकांच्या हेलिकॉप्टर, विमान तपासणीत कोणताही भेदभाव केला जात नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सामानाची तपासणी होत असून त्यात अपवाद करण्यात येत नाही, असे राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने म्हटले आहे. शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बॅगांच्या तपासणीचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाच केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मंगळवारी राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निरीक्षकांची बैठक घेतली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांनी राज्यातील सर्व केंद्रीय निरीक्षकांना निष्पक्ष राहण्याची तंबी दिली आहे.

पान २ वर

## ...म्हणून शरद पवार, सुप्रिया सुळेंनी राममंदिर दर्शन घेतलं नाही', अमित शहा कडाडले



● नागपूर, नितीन देवळेकर :

'मी संपूर्ण महाराष्ट्रात फिरलो. मी विदर्भात, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबईसह सगळ्या महाराष्ट्रात फिरलो. मी आजच विधानसभेचा निकाल सांगतो, २३ तारखेला आघाडीचा सुफडा साफ होणार आणि महाराष्ट्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार बनेल... असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. सिंदखेडराजा येथे भाजप महायुतीचे उमेदवार जयकुमारभाऊ रावल यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेमध्ये ते बोलते होते. यावेळी बोलताना अमित शहा यांनी काँग्रेससह शरद पवार, राहुल गांधींवर जोरदार टीका केली.

'२० तारखेला संपूर्ण महाराष्ट्रात मतदान होत आहे. मी संपूर्ण महाराष्ट्रात फिरलो. मी विदर्भात, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबईसह सगळ्या महाराष्ट्रात फिरलो. २३ तारखेला आघाडीचा सुफडा साफ होणार आणि महाराष्ट्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार बनेल. काँग्रेसने हरियाणामध्येही खोटे आश्वासने दिले. तिथे काँग्रेसचा सुफडासाफ झाला. झारखंडमध्येही ८० पैकी ५० पेक्षा जास्त जागा भाजप जिंकेल,' असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला.

'देशातील १८० कोटी जनता नरेंद्र मोदी आणि एनडीएसोबत आहेत. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणीही कमळासोबत, भाजपसोबत आहेत. महायुतीचे सरकार बनवा सर्वांच्या बँक खात्यात २१०० रुपये दर महिना जमा होतील. यावेळी महाराष्ट्रात महायुती आपल्या काळात आजपर्यंत सर्वाधिक जागा जिंकू महायुती सरकार बनवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारताला महान देश बनवण्याच्या संकल्पात महाराष्ट्रही जोडला जाईल. शरद पवार, सुप्रिया सुळे, राहुल गांधी कोणीही राममंदिराच्या दर्शनाला आले नाहीत, कारण त्यांना त्यांच्या वोट बँकेची भिती वाटते. महाविकास आघाडी म्हणजे औरंगजेब फॅनक्लब आहे तर महायुती छत्रपती शिवाजी महाराज आणि सावरकरांच्या सिद्धांतावर चालणारा गट आहे,' असंही अमित शहा यावेळी म्हणाले.

काँग्रेस पार्टी एसटी, एससी आणि मागासवर्गियांचा विरोध करते. नरेंद्र मोदींनी एका गरिब आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवण्याचे काम केले. नरेंद्र मोदींनी आपल्या मंत्रिमंडळात सर्वाधिक खासदार मागासवर्गियांमधून येत आहेत.

- पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# भारत आणि चीन देशातल्या पर्यटकांसाठी २०२५ पासून ९० दिवसांसाठी व्हिसा

दोन्ही देशांतल्या पर्यटकांसाठी, जानेवारी २०२५ पासून, ९० दिवसांसाठी व्हिसा माफ करण्यात येणार असल्याची बातमी आहे. गेली चार वर्षे चिनी पर्यटकांना भारत व्हिसा देत नाही. गेली ३ वर्षे दर सहा महिन्यांनी अशा वावड्या उठतात; पण ती केवळ अफवा होती असे नंतर लक्षात येते. यंदा मात्र राजकीय नेत्यांच्या हालचाली आणि ब्रिक्स परिषदेनंतर पर्यटकांचे येणे जाणे सुरू होईल, असे वाटते आहे.

डोकलाम, अरुणाचल प्रदेश आणि लडाखमधील गलवान खोरे, यामुळे भारत आणि चीनमधील तणाव वाढला. त्यात पडलेली कोविडची भर. कोविडच्या सुरुवातीला एकूणच कुठल्याही प्रवासाला मज्जाव होता. पण हळूहळू स्थिती बदलली आणि आंतरदेशीय प्रवासपण सुरू झाला. चीनने भारतीय नागरिकांना व्हिसा देण्यास सुरुवात केली. पण भारताने चिनी पर्यटकांवर बहिष्कार टाकला. हा बहिष्कार केवळ चिनी प्रवाशांकरताच होता. याच चार वर्षांत भारत आणि चीनच्या व्यापाराने मात्र उच्चांक गाठला. दोन्ही देशांतल्या व्यापाराने शंभर अब्ज डॉलर्सचा आकडा कधीच ओलांडला आहे. दोन्ही देश उत्पादने आणि सामग्रीसाठी एकमेकांच्या बाजारपेठांवर अवलंबून असल्याने व्यापार वाढतोच आहे. व्यापाराचे फायदे काहीवेळा राजकीय तणावापेक्षा जास्त असू शकतात. पण चिनी प्रवाशांना व्हिसा दिला जात नव्हता.

पर्यटन हा देशासाठी भरपूर परकीय चलन कमावून देणारा उद्योग. चीनच्या पर्यटकांना व्हिसा नाकारून, भारत या चलनाला फार मोठ्या प्रमाणात मुकला आहे. चीन आणि भारत, सर्वात जास्त लोकसंख्या असलेले देश आणि जागतिक स्तरावर सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्था; पर्यटन व्यवसायाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. दोन्ही देशांतले आर्थिक सहकार्य, म्हणजे व्यापार, भागीदारी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यटनाला प्रोत्साहन देते. पर्यटनामुळे सांस्कृतिक संबंध मजबूत होतात आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थांना चालना मिळते. या उद्योगाला पूरक असे अनेक जोडव्यवसाय उभे राहतात. त्याचबरोबर आदरातिथ्य आणि वाहतूक क्षेत्रात नोकऱ्यापण उपलब्ध होतात. भारत-चीनमधले पर्यटन कोविड-पूर्व काळात जोरात सुरू होते, ज्यामुळे पर्यटनाशी संबंधित पायाभूत सुविधांमध्ये सीमापार गुंतवणुकीत सकारात्मक वाढ झाली, आणि दोन्ही राष्ट्रांमध्ये रोजगार आणि विकासाला हातभार लागला.


मात्र गेली चार वर्षे हा विकास ठप्प आहे. अनेक ठिकाणी चीनमधून आयात केलेली अनेक यंत्रे तशीच पडून आहेत. यंत्रे आयात झाली; पण त्यांना चालवणारे इंजिनिअर्स किंवा असेम्बल करणाऱ्या चिनी लोकांना व्हिसाच मिळाला नाही. चिनी दुभाषी भाषांतर करतात; पण कारखानदार त्यानुसार धोका पत्करायला तयार नसतात, यंत्र निकामी झाले तर?..

भारत पहायला येणाऱ्या चिनी लोकांची संख्या कोविड-पूर्व काळात खूप मोठी होती. एक तर त्या मानाने भारतातला प्रवास स्वस्त, येण्या-जाण्याला लागणारा वेळ कमी, भारत एक मोठी बाजारपेठ, त्यामुळे इथे भरणाऱ्या प्रदर्शनांमध्येही चिनी कंपन्यांचा मोठा सहभाग असे. चिनी जेवण, चिनी बोलणारे गाइड मिळण्याची सुविधा, स्वतःच्या बजेटमध्ये राहण्या-फिरण्याची सुविधा, ताजमहाल, देवळे, महाल, वाघ आणि भगवान बुद्धाची देव-भूमी म्हणून चिनी पर्यटकांचे लोंढेच्या लोंढे भारत पर्यटनासाठी येत असत.

चिनी पर्यटकांना नेहमीच चिनी बोलणारा गाइड लागतो. केवळ चिनी भाषिक पर्यटकांना सगळ्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रवास कंपन्यांचा उगम झाला. गेल्या चार वर्षांत भारत-चीन पर्यटनावर अवलंबून असलेल्या अनेक कंपन्या बंद झाल्या. केवळ भारतातच नव्हे तर चीन आणि हॉंगकॉंगमध्येदेखील. बेरोजगारीत या लोकांचीही भर पडली. अस्सल चिनी जेवण देणारी हॉटेल्स अपवादवगळता बंद पडली. खास चिनी पर्यटकांसाठी चहा आणि इतर गोष्टी विकणारी दुकानेही बंद पडली.

कोविडपूर्वी चिनी माणसांमध्ये भारतीय पारंपरिक कला, पाककृती आणि सणांचे कुतूहल होते. त्यामुळे पर्यटन वाढले. याउलट, राजकीय तणावांमुळे बहिष्कार टाकण्याची भावना अधिक दृढ झाली. एकूणच वाढलेल्या तणावपूर्ण संबंधांमुळे अनेक लोक बेरोजगार झाले आणि अर्थव्यवस्थेवरदेखील याचा परिणाम झाला. या तणावांचा पर्यटन उद्योगातील आणि चीनबरोबर इतर उद्योगांमधल्या गुंतवणुकीवरही परिणाम झाला आहे.

## आजची चित्रोळी



उघडून तिसरा नेत्र सदाशिव
करील ताण्डवा सुरू !
उध्वस्त होऊन जाण्यापासून
कोण शके सावरू ??

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी साताराचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# १४ नोव्हेंबर : बालदिन!




आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळयाविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## पान १ वरून...

पान १ वरून...

### ⏭|...म्हणून शरद पवार, सुप्रिया सुळेंनी...

काही दिवसांपूर्वीच काँग्रेस अध्यक्षांना उलेमा भेटले आणि मुस्लिमांना आरक्षण देण्याची मागणी केली. तुम्ही मुस्लिम आरक्षणासाठी सहमत आहात का? राहुल गांधी तुम्हाला सांगतो,तुमची चौथी पिढी आली तरी मुस्लिम आरक्षण मिळणार नाही. तसेच राहुल गांधीच नव्हे, इंदिरा गांधी स्वतः स्वर्गातून आल्यातरी आता पुन्हा ३७० लागू होणार नाही, असा टोलाही अमित शहा यांनी यावेळी लगावला. तसेच २३ तारखेला कमळाच्या चिन्हावर इतक्या रागाने दाबा की इटलीला करंट गेला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी धुळेकरांना केले.

### ⏭| 'पक्ष निर्माण करायला अक्कल लागते,...

पक्ष निर्माण करायला अक्कल लागते, पक्ष फोडायला अक्कल लागत नाही, असं म्हणत शरद पावर यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली आहे.

सभेला संबोधित करता शरद पवार म्हणाले की, "२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा एक आणि आमचे चार खासदार होते. मात्र घटना धोक्यात असल्याने तुम्ही आमचे ३१ खासदार निवडून दिले. आता भाजप आणि आमच्यातल्या फुटून गेलेल्या लोकांचे राज्य आहे." ते म्हणाले, "उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवारांसह अनेकजण मंत्री होते. मात्र शिंदेंनी काही लोक घेतले आणि गुहाटीला जाऊन बसले. उद्धव ठाकरेंचे सरकार पाडले. पक्ष फोडून सत्ता मिळवणे ही लोकशाही आहे का? पक्ष फोडल्याचे देवेंद्र फडणवीस स्वतः म्हणाले."

### ⏭| हेलिकॉप्टरमधील बॅगांची तपासणी...

आढावा बैठकीत कुठलाही पक्षपातीपणा न दाखवता सर्व उमेदवारांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्या, त्यांना संपर्कासाठी उपलब्ध राहण्याच्या सूचना दिल्या. तक्रार अथवा समस्या मांडण्यासाठी निरीक्षक उपलब्ध होत नाहीत, अशी तक्रार उमेदवारांकडून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, अशी ताकीदही आयुक्त कुमार यांनी दिली. राज्यात नियुक्त असलेले केंद्रीय बल आणि राज्य पोलीस दल यांनीही निष्पक्षपणे काम करत असून कुठल्याही पक्षाला झुकते माप देणार नाही, याची खबरदारी घेण्याचेही निर्देश निरीक्षकांना देण्यात आले. प्रचारादरम्यान महिलांच्या सन्मानाशी कुठेही तडजोड केली जाणार नाही, याविषयी जागरूक राहण्याविषयीही निरीक्षकांना सूचना देण्यात आल्या.

### ⏭| शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील...

सरकारी कार्यालयात प्रचाराला बंदी असताना चित्रलेखा पाटील यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आपल्या कार्यकर्त्यांसह जावून तिथं आपला प्रचार केला; असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. त्याची दखल घेवून अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### ⏭| 'एखादी व्यक्ती गुन्ह्यातील आरोपी म्हणून...

८. संबंधित व्यक्तीची योग्य त्या प्राधिकरणासमोर प्रत्यक्ष सुनावणी झाल्यानंतर त्या सुनावणीचा तपशील रेकॉर्ड करण्यात यावा. पाडकामाच्या अंतिम आदेशांनंतर अतिक्रमणाच्या बाबतीत तोडगा काढता येण्यासारखी स्थिती आहे का? याची चाचपणी केली जावी. जर संबंधित अतिक्रमण बांधकामाचा फक्त काही भाग नियमाचं उल्लंघन करत असेल, तर मग पाडकामाचा टोकाचा निर्णय का घेण्यात आला, याची चाचपणी केली जावी.

९. यानंतर पाडकाम आवश्यक असल्याचा निष्कर्ष निघाल्यास ते आदेशदेखील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावेत.

१०. पाडकामाचा निर्णय अंतिम केल्यानंतर संबंधित मालमत्ता मालकाला अतिक्रमित बांधकाम हटवण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. जर यासंदर्भातले आदेश व आढावा घेणाऱ्या अधिकृत प्राधिकरणानं कारवाईला स्थगिती दिली नसेल, तरच पाडकामाची प्रक्रिया सुरू करावी.

११. पाडकाम प्रक्रियेचं पूर्ण चित्रीकरण केलं जावं व ते पुढील संदर्भासाठी जतन करून ठेवावं.

१२. यानंतर पाडकाम केल्याचा पूर्ण अहवाल संबंधित पालिका आयुक्तांना पाठवला जावा.

हे नियम प्रशासनाने काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश न्यायालयाने आपल्या निकालात दिले आहेत. तसेच, या आदेशांचं उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकाऱ्याला दोषी धरलं जाईल, हेदेखील न्यायालयाने स्पष्ट केलं. अशा प्रकरणात संबंधित अधिकाऱ्याला स्वत:च्या खर्चातून पाडकामादरम्यान झालेलं नुकसान भरून देण्यास सांगितलं जाईल. तसेच, मालमत्ता मालकाला नुकसानभरपाईही देण्याचे निर्देश दिले जातील. दरम्यान, यावेळी हे आदेश रस्ते, नद्या अशा सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांना लागू नसतील, असंही न्यायालयाने नमूद केलं.

### ⏭| आपली लढाई महाविकास नव्हे तर...

जिथे विभागणी होते, त्याच ठिकाणी हिंदू उत्सवादरम्यान दगडफेक होते. त्यामुळे मतांचे विभाजन होऊ देऊ नका.

आपली लढाई महाविकास नव्हे तर महाअडाणी आघाडी विरोधात आहे. ते लव जिहाद, लँड जिहाद सारख्या प्रकाराला प्रोत्साहन देतात. त्यामुळे चुकूनही त्यांचा विचार करू नका. अन्यथा आपले सण गणेशोत्सव, रामनवमीच्या मिरवणुकीवर दगडफेक होईल. निवडणुकीत कुठल्याही परिस्थितीत विभागले जाऊ नका, असे आवाहन योगी आदित्यनाथ यांनी केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आता नवीन भारताच्या सीमा सुरक्षित आहे. ५०० वर्षांत जे कार्य झाले नाही, ते नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात अयोध्यामध्ये भव्य राम मंदिर उभारून झाले. हा डबल इंजिन सरकारचा लाभ आहे. सर्व समस्यांचे समाधान केवळ डबल इंजिन सरकार असू शकते, असे देखील ते म्हणाले.

### ⏭| मुंबईतील वैद्यकीय महाविद्यालयांबरोबर...

तसेच पुढील दोन महिने वेतन मिळण्याची शक्यता नसल्याने कौटुंबिक आणि दैनंदिन खर्च कसा भागवायचा असा प्रश्न या परिचारिकांना पडला आहे.

सलग चार महिने वेतन न मिळाल्याने या परिचारिका संतप्त झाल्या आहेत. कर्मचारी क्रमांक तयार झाला नाही, यात प्रशासनाची चूक असून, त्यासाठी आम्हाला वेठीस का धरले जात आहे, असा प्रश्न परिचारिकांनी उपस्थित केला आहे. या परिचारिकांनी गेले चार महिने वेतन न मिळाल्याची बाब महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांना पत्र पाठवून त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे समस्या मांडण्यात आली आहे. ते याबाबत तातडीने योग्य तो निर्णय घेतील. ८ ते १० दिवसांमध्ये वेतन देण्याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास पुढील विचार करावा लागेल, असा इशारा महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश देवदास यांनी दिला.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# व्याजाचे पैसे उशिरा परत दिल्याच्या वादातून भररस्त्यात व्यावसायिकावर तलवारीने हल्ला



**ठाणे (रोहित जैसवार) :** एका महिलेच्या पतीनं व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना भिवंडीत उघडकीस आलीय. व्यावसायिकाने शेजारील महिलेकडून व्याजावर पैसे घेतले होते, परंतु ते पैसे फेडण्यास व्यावसायिकास थोडा उशीर झाला. पैसे उशिरा परत केल्याच्या रागातून त्या महिलेच्या पतीने व्यावसायिकावर तलवारीने वार करीत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. खरं तर ही घटना भिवंडी तालुक्यातील खारबाव गावातील भर रस्त्यात घडलीय. या हल्ल्याचा थरार सीसीटीव्हीत कैद झालाय. याप्रकरणी हल्लेखोराच्या विरोधात भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेनंतर आरोपी फरार झालाय. दर्पण मंगलदास पाटील असे गुन्हा दाखल झालेल्या हल्लेखोराचे नाव असून, तर प्रेमनाथ अंतुराम मढवी (४२) हा व्यावसायिक हल्ल्यात जखमी झालाय.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार जखमी प्रेमनाथ मढवी यांचा खडी, क्रशर, दगड वितरण करण्याचा व्यवसाय आहे. त्यांनी शेजारील हल्लेखोर दर्पण याची पत्नी मनीषा हिच्याकडून दीड वर्षांपूर्वी व्याजाने १५ हजार रुपये घेतले होते. त्यानंतर १ वर्षापूर्वी प्रेमनाथने व्याजाने घेतलेले पैसे परत करण्यासाठी दर्पणने प्रेमनाथशी भांडण केले होते. त्यामुळे प्रेमनाथने मनीषाकडून घेतलेले पैसे परत केले. मात्र तरीही आरोपी दर्पणने प्रेमनाथ घरी नसताना त्यास कोयता घेऊन जात जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर याच रागातून ८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे दहा वाजताच्या सुमारास प्रेमनाथ खारबाव नाक्यावर मच्छी आणायला रस्त्याने जात असता आरोपी दर्पणने पाठीमागून येऊन प्रेमनाथवर तलवारीने सपासप वार करून त्यास ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले.

दरम्यान, प्रेमनाथवर भिवंडीतील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी दर्पणच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम १०९, ३५२ सह सशस्त्र अधिनियम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासो एडके यांनी दिलीय. तसेच फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आलं असून, लवकरच त्याला अटक करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितले. मात्र भर दिवसा रस्त्यात घडलेल्या या हल्ल्लाच्या थरारामुळं परिसरात भीतीचे वातावरण पसरलंय.

# मुरबाड ग्रामीण रुग्णालयात सुरू होत आहे डायलिसिस सेंटर!



**मुरबाड (सुचित शिंदे) -** ग्रामीण रुग्णालय मुरबाड (ट्रॉमा केअर सेंटर) येथे मुरबाड व तालुक्यातील रुग्णांच्या करिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे ५ बेडचे डायलिसिस सेंटर ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होत आहे. या डायलिसिस सेंटरची आज पासून सुरुवात करण्यात आली आहे.

रूग्णालयात सुरू करण्यात आलेले डायलिसिस सेंटर हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे असून, या ठिकाणी एकावेळी ५ रुग्णनां उपचार घेणे सहज शक्य होणार आहे. रूग्णालयात सुरू झालेल्या डायलिसिस सेंटर मुळे मुरबाड व तालुक्यातील रुग्णांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. तसे पाहिले तर मुरबाड हे अतिशय दुर्गम आणी आदिवासी भागात येणारे ठिकाण असल्याने या ठिकाणांहून रुग्णांना डायलिसिस साठी इतरत्र दुर पर्यंत जाऊन उपचार घ्यावे लागत असत, मात्र आत्ता मुरबाडमध्ये हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर उभा राहिल्या मुळे रुग्णांची होणारी हेळसांड आता पूर्णपणे थांबणार आहे.

रुग्णालयातील डायलिसिस सेंटर मध्ये मोफत डायलिसिस होणार असून या विनामूल्य डायलिसिस सेवेचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आव्हान रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संग्राम डांगे यांनी केले आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून किडणी विकार तज्ञ डॉ. अनिकेत जगन्नाथ, डॉ.संग्राम डांगे, डॉ.सुनील विश्वकर्मा, सहाय्यक अधीक्षक माणिक गायकवाड, परीसेविका जयश्री चौधरी तसेच रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होते.

# परतीच्या पावसामुळे भात पिकाच्या भा-यां मध्ये मोठ्या प्रमाणात घट!

**मुरबाड (सम्यक कासारे) -** मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसे आदिवासी व शहरी भागात यंदा परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात शिरकाव केल्याने भात शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात नासधूस झाल्याने प्रत्येक शेतकऱ्याला आपापल्या शेतामध्ये १०० भाडे किंवा २०० भाडे किंवा त्यापेक्षा ३०० भाडे मिळायचे त्या ठिकाणी शंभरच्या भाड्या ऐवजी येथे ५५ भाडे मिळाले तर २०० भाडे ऐवजी १०० भाडे मिळाले व ३०० भाडे मिळायचे या ठिकाणी१६० भाडे मिळाले अशाप्रकारे यंदा भात पिकाच्या बाबतीत सर्वच ठिकाणी भात कापणी केल्यानंतर भाताची करपा गोळा करताना अक्षरशा मजुरांसह शेतीच्या मालकांना मोठी मेहनत घ्यावी लागली त्यानंतर करपा गोळा केल्यानंतर त्याच शेतात त्याच जागेवर भाताचे भारे बांधले जातात त्यानंतर शेतकरी वर्गाच्या लक्षात आलं यंदा परतीच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खऱ्या अर्थाने शेतामध्येच भाताची पिके आडवी पडली होती त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे भाताचे भारे मिळायला हवे होते. तालुक्यात सुरुवातीला चांगला पाऊस पडत त्यावेळी शेतकरी वर्गाला वाटत होता की यंदा भाताचे पीक दुप्पटीने मिळणार अशा होत्या परंतु निसर्गापुढे सगळे नतमस्तक होतात याच म्हणीवरून मेघराजाने होत्याचं नव्हतं अशा प्रकारे पाऊस पडल्याने शेतीची देयनीय अवस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे यंदा दरवर्षी भाताचे भारे शेतकऱ्याला जास्त मिळायचे परंतु यंदा परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांना भाताचे भारे कमी मिळाले आहेत.

# मानवी साखळीच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती





**ठाणे (यश सावंत) -** मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी लोकशाहीने दिलेला आपला हक्क बजावावा, यासाठी स्वीपच्या माध्यमातून १४९ कळवा मुंब्रा विधानसभा मतदारसंघामध्ये नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आज स्वीपच्या माध्यमातून मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. यात मोठ्यो प्रमाणावर शालेय विद्यार्थी, शिक्षक सहभाग घेवून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

“माझे मत माझा अधिकार.. मी अवश्य मतदान करणार”, “आओ मिलकर फर्ज निभाए, हर वयस्क से मतदान कराएँ” असे फलक हातात घेवून विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती केली. या मानवी साखळीत नागरिक देखील मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सर्वांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली.

# डोंबिवलीतील फ्लॅटमध्ये तरुण पाळत होता अजगर, कासव, सरडा, माकड...; वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत झाली कारवाई

**डोंबिवलीत (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवलीत वन विभागाने पोलिसांच्या मदतीने मोठी कारवाई केली आहे. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत वन विभागाने मोठी कारवाई केली असून प्रतिबंधित विदेशी वन्यजीव जप्त केले आहेत. पोलीस आणि वन विभागाचे अधिकारी धाड टाकण्यासाठी पलावामधील फ्लॅटमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. कारण घरात कासव, साप, अजगर, सरडा यांच्यासह चिंपाझी माकडदेखील होतं. घराचा मालक फरार असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वन विभागाला एका खबऱ्याच्या माध्यमातून ही माहिती मिळाली होती. ठाणे उपवनसंरक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हीकरवाई करण्यात आली

कल्याण वनक्षेत्राच्या अखत्यारितील नियतक्षेत्र पिसवलीमधील डोंबिवली जवळील एक्स्पिरिया मॉलसमोरील पलवा सिटी येथील एका इमारतीत आठव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये वनविभाग व राज्य राखीव पोलीस दलाचे पोलीस व मानपाडा पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत या वन्यजीवांना ताब्यात घेण्यात आलं. कारवाई दरम्यान संबंधित आरोपी घटनास्थळी आढळून आला नाही. जप्त करण्यात आलेले वन्यजीव स्थानिक स्वयंसेवी संस्था बिरसा मुंडा, कल्याण यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात सुपूर्द करण्यात आले आहेत. या प्रकरणात पंचनामा व आवश्यक कागदपत्रे तयार करून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.



मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमधून आलेल्या निनावी फोनमुळे ठाणे वन अधिकाऱ्यांना डोंबिवली येथील पलावा सिटी येथील तीन बेडरूमच्या फ्लॅटमध्ये बेकायदेशीररित्या प्राणी पाळलं जात असल्याचं समजलं. यावेळी पिंजऱ्यात बंदिस्त चिंपाझी माकड होता. हे माकड सहसा बोर्निओ आणि सुमात्रा च्या जंगलात आढळतात आणि एक लुप्त होत असललेली प्रजाती म्हणून सूचीबद्ध आहे.

जेव्हा वन अधिकारी लोढा टाउनशिपमधील फ्लॅटवर पोहोचले तेव्हा त्यांना प्लास्टिकच्या कंटेनरमध्ये १५ सरपटणारे प्राणी आढळले ज्यात अजगर आणि सरडा यांचा समावेश आहे, ज्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. वन अधिकाऱ्यांना एक स्टार कासव देखील सापडले आणि बेडरुमच्या आत एक मोठा पिंजरा होता ज्यामध्ये एक माकड होतं. फ्लॅटमध्ये सफाई कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या मुलाने अधिकाऱ्यांसाठी दरवाजा उघडला. मालक सहा महिन्यांपूर्वी येथे राहायला आल्याचं त्याने सांगितलं.

जप्त केलेल्या प्राण्यांमध्ये उत्तर आणि मध्य आफ्रिकेत आढळणारे सहा बॉल अजगर, एक गोल्डन चाइल्ड रेटिक्युलेटेड अजगर जो जगातील सर्वात मोठ्या अजगरांपैकी एक आहे, एक सरडा, ६ कासव, एक भारतीय स्टार कासव जो धोक्यात आहे आणि एक माकड आढळलं.

“जप्त केलेले वन्यजीव तात्पुरते कल्याण येथील बिरसा मुंडा या स्थानिक स्वयंसेवी संस्थेकडे काळजी आणि देखरेखीसाठी सुपूर्द करण्यात आले आहेत. सविस्तर पंचनामा आणि इतर कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत आणि आरोपींचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे, “ असं वनविभागाच्या एका निवेदनात म्हटले आहे.

एका पंचतारांकित हॉटेलच्या कर्मचाऱ्याने आरोपींबाबत दिलेल्या माहितीच्या आधारे धाड टाकण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली होती. यानंतर दोन दिवस माग काढत पाळत ठेवण्यात आली. पण छापा टाकला तेव्हा तो पळून जाण्यात यशस्वी झाला. वनविभागाने गेल्या काही वर्षात केलेल्या मोठ्या कारवाईपैकी ही एक आहे.

# मुख्यमंत्री येती शहरा, आधी रस्ते दुरुस्त करा

## अंबरनाथमधील खड्ड्यांपासून खाचखळगे तातडीने दुरुस्ती




**अंबरनाथ (आकाश कांबळे) :** महिनोन महिने ज्या रस्त्यांवर, चौकांमध्ये असलेले लहान मोठे खड्डे, चुकीच्या कामामुळे पडलेले खाच खळगे यांवरून सर्वसामान्य निमुटपणे प्रवास करत असतो. मात्र एखादा मोठा नेता आला की तातडीने हे रस्ते दुरुस्त केले जातात. तशीच काहीशी परिस्थिती बुधवारी अंबरनाथमध्ये पहायला मिळत होती. अंबरनाथ शहरात शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे मुख्य नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार असल्याने सकाळपासूनच त्यांच्या मार्गातले अडथळे दूर केले जात होते. मटका चौक, उड्डाणपूल या भागात असलेले खड्डे डांबराने बुजवले जात होते. अनेक महिने या रस्त्यावरून प्रवास करणारे नागरिक या तातडीच्या दुरुस्तीवर आश्चर्य व्यक्त करत होते.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचारासाठी अवघे सहा दिवस शिल्लक असल्याने सर्वच महत्वाचे नेते प्रचारासाठी सभा घेत आहेत. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार आणि महायुतीचे उमेदवार डॉ. बालाजी किणीकर यांच्यासाठी बुधवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा होणार आहे. अंबरनाथ पूर्वेतील बाह्यवळण रस्त्यावर ही सभा होईल. त्यासाठी पश्चिमेतील हेलिपॅडवर एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर उतरेल अशी शक्यता आहे. त्यामुळे त्या स्थळापासून सभास्थळापर्यंतचे रस्ते सुस्थितीत करण्यासाठी बुधवारी सकाळपासूनच स्थानिक शासकीय यंत्रणांची धावपळ दिसत होती. शहरातील मटका चौक ते सभा स्थळापर्यंत जाण्यासाठीच्या रस्त्यावर भर चौकातच अनेक महिन्यांपासून खड्डे पडले होते. तर पुढे उड्डाणपुलाच्या प्रवेशद्वारावरही खाचखळगे होते. त्यातून दररोज वाहनचालकांना त्रास सहन करत प्रवास करावा लागत होता. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या येण्यापूर्वी हे खड्डे भरण्यात आले.

सकाळी सर्व यंत्रणा रस्त्यावर सक्रिय होती. त्यामुळे किमान मंत्र्यांच्या येण्यानेही का होईना रस्ते तर चांगले झाले अशी प्रतिक्रिया सर्वसामान्य प्रवासी देत होते. याच कल्याण बदलापूर मार्गावरून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीही बुधवारी प्रवास करणार आहेत. उल्हासनगरातील भाजप उमेदवार कुमार आयलानी यांच्यासाठी ते प्रचार सभा घेणार आहेत. त्यामुळे हा रस्ता कधी नव्हे ते सुस्थितीत आणण्यात येत होता.

# कल्याणमध्ये दीड महिन्याच्या बालिकेची विक्री करणाऱ्या डोंबिवलीतील चार जणांना अटक




**कल्याण (गणेश बागडे) –** कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील एका मागतेकरी महिलेच्या दीड महिन्याच्या बालिकेची चार लाख रुपयांना विक्री करणाऱ्या बालिकेच्या मागतेकरी आईसह डोंबिवलीतील तीन जणांना ठाणे येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने कल्याण पश्चिमेतील रामदेव हॉटेलजवळील सहजानंद चौक येथे मंगळवारी अटक केली.


वैशाली किशोर सोनावणे (३५, रा. सिद्धार्थनगर झोपडपट्टी, कोपररोड, डोंबिवली) या मध्यस्थ महिलेच्या माध्यमातून हा विक्री व्यवहार होत होता. वैशाली मूळच्या मालेगावच्या आहेत. दीपाली अनिल दुसिंग (२७, रा. सिध्दार्थनगर झोपडपट्टी), रेखा बाळू सोनावणे (३२) या बालिकेच्या विक्री व्यवहारातील बालिकेची आई आहेत. त्या कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात राहतात. किशोर रमेश सोनावणे (३४, रिक्षा चालक) अशी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल व्यक्तींची नावे आहेत.

पोलीस आयुक्तालयातील जनसंपर्क विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिलेली माहिती अशी, ठाणे येथील गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला डोंबिवली येथे राहणारी वैशाली आणि इतर मध्यस्थ हे एका स्त्री किंवा पुरुष जातीच्या लहान बाळाची कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता न करता विक्री व्यवहार करणार आहेत, अशी गुप्त माहिती मिळाली होती. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी एक विशेष पथक तयार करून विक्री व्यवहार करणाऱ्यांना सापळ्यात अडकविण्याची व्यूहरचना आखली. पोलिसांनी बाळ खरेदीसाठी एक बनावट ग्राहक तयार केला. या ग्राहकाच्या माध्यमातून पोलीस मध्यस्थ महिलेच्या संपर्कात गेले. मध्यस्थ महिलेने आपल्याकडे स्त्री जातीचे ४२ दिवसांचे बालक असल्याचे बनावट ग्राहकाला सांगितले. ही बालिका पाहिजे असेल तर आपणास चार लाख रुपये द्यावे लागतील असे सांगितले. विक्री व्यवहारातील बालक आम्ही कल्याण पश्चिमेतील रामदेव हॉटेलजवळ सहजानंद चौक भागात घेऊन येणार आहोत. प्रथम तुम्ही बालिकेला पहा मग पैसे घेऊन या, असा निरोप मध्यस्थ महिलेने बनावट ग्राहकाला दिला. मध्यस्थ महिला सहजानंद चौक येथे मंगळवारी येणार आहे समजल्यावर पथकाने त्या भागात सापळा लावला.

मध्यस्थ महिलेसह गुन्हा दाखल चारही व्यक्ती बनावट ग्राहकाला लहान बालिका दाखविणे आणि विक्री व्यवहार करत असताना सापळा लावून असलेल्या पथकाने मध्यस्थ महिलेसह इतरांवर झडप घातली आणि त्यांना अटक केली. जागरूक तक्रारदारांच्या पुढाकारामुळे बालिकेचा विक्री व्यवहार उघड झाला. याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेमधील मुलांची काळजी व संरक्षण कायद्याने चारही जणांवर गुन्हा दाखल केला.

मागतेकरी महिला रेखा सोनावणे हिच्या दीड महिन्याच्या बालिकेचा विक्री व्यवहार चार जण करत होते. या महिलेला पाच वर्षांचा मुलगा, सात आणि नऊ वर्षांच्या मुली असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पथकाने ही बाळे ताब्यात घेतली. त्यांच्या सुरक्षा आणि देखरेखीसाठी पाच वर्षांच्या मुलाला डोंबिवली एमआयडीसीतील जननी आशीष बालगृह, दोन बहिणींना अंबरनाथ येथील नीला बालसदन येथे ठेवण्यात आले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, उपनिरीक्षक स्नेहल शिंदे यांच्या पथकाने पार पाडली.

# संत तुकारामांच्या अभंगगाथेवरील 'आनंदडोह' चित्रपटाची घोषणा, दिग्पाल लांजेकर करणार दिग्दर्शन




मुंबई - अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेतील संत विचारावर महाराष्ट्र समृध्द झाला आहे. या संतांनी अभंग-श्लोक-ओव्या याच्या रचनांमधून अभिजात साहित्याचा अलौकिक ठेवा मराठी भाषेला दिला. अध्यात्म, रुढी-परंपरांकडे पाहण्याची एक निर्मळ दृष्टीही बहाल केली आहे. आजच्या काळात या अपार दृष्टीची आपल्या सर्वांना नितांत आवश्यकता आहे. 'शिवराज अष्टकाच्या' माध्यमातून लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज अन त्यांच्या शूर शिलेदार आणि मावळ्यांचा इतिहास जागतिक सिनेमांच्या पातळीवर नेऊन ठेवलाय. 'शिवराज अष्टक' नंतर आता संत साहित्याचे समृद्ध संचित घराघरांत पोहोचावण्यासाठी दिग्पाल लांजेकर यांनी आता एक पाऊल पुढं टाकलं आहे.

'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट बनवल्यानंतर आता संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेवरील 'आनंदडोह' या नव्या चित्रपटाची घोषणा लांजेकर यांनी केली आहे. या चित्रपटाचे आकर्षक मोशन पोस्टर नुकतंच रिलीज करण्यात आलं आहे. 'साईराम एंटरप्राईजेस' निर्मित, योगेश सोमण लिखित आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'आनंदडोह' हा संतपट २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अविनाश शिंदे यांनी या चित्रपटाची निर्मितीची जबाबदारी उचलली आहे. मुक्ता बर्वे, योगेश सोमण, अजय पूरकर, समीर धर्माधिकारी, आदिनाथ कोठारे हे कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत.

जगद्गुरु तुकाराम महाराजांची अभंगगाथा हा अभिजात मराठी साहित्यातील मैल्यावान ठेवा आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेशी टक्कर देताना त्यांनी बहुजन समाजाला ज्ञानमार्ग दाखवणारे अनेक अभंग रचले. त्यांच्या ३००० हून अधिक अभंगातून आजही आपल्याला जगण्याची प्रेरणा आणि योग्य दिशा मिळत असते. या अभंगगाथेतल्या तत्वज्ञानाला तत्कालीन रूढीवादी तथाकथित धर्म पंडितांनी विरोध केला. संत तुकाराम महाराजांची ही गाथा इंद्रायणी नदीच्या डोहात बुडवून टाकण्यात आली. तरीही संत तुकारामांच्या भक्तीचा चमत्कार म्हणून हे अभंग इंद्रायणीच्या पाण्यावर तरले, असं म्हटलं जातं. ही अद्वित्तीय अभंगगाथा इंद्रायणीच्या डोहात बुडवल्यापासून ते तरंगेपर्यंतच्या तेरा दिवसात जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, त्यांची पत्नी आवली, त्यांचे कुटुंब, संपूर्ण तत्कालीन समाज आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे पाईक या सर्वांवर काय परिणाम झाला याची कथा 'आनंदडोह' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

## अशोक शिंदे यांनी का नाकारली 'छावा' चित्रपटाची ऑफर; म्हणाले....



मराठी सिनेसृष्टीतील नावाजलेले अभिनेते म्हणजे अशोक शिंदे. आजवर अशोक शिंदे यांनी अनेक चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. 'दामिनी', 'घरकुल', 'सुवासिनीची सत्व परीक्षा', 'दुहेरी', 'छत्रीवाली, 'काकण' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. अलिकडेच अशोक शिंदे झी मराठीवरील 'सारं काही तिच्यासाठी' या मालिकेमुळे चर्चेत आले होते. काही दिवसापूर्वीच या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. नुकतीच अशोक शिंदे यांनी एका मुलाखतीत त्यांनी बहुचर्चित 'छावा' चित्रपटात काम करण्यास नकार का दिला? याबद्दल सांगितलं. नुकतीच अशोक शिंदेंनी 'इट्स मज्जा'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी 'छावा' चित्रपट न करण्यामागचं कारण सांगितलं. या मुलाखतीत ते म्हणाले, "लक्ष्मण उतेकर यांचा 'छावा' चित्रपट येतोय. या चित्रपटात काम करण्यासाठी त्यांनी मला विचारलं. तर त्यांच्या तारखा मॅच होत नव्हत्या. तेव्हा माझं झी बरोबर कॅन्ट्रॅक्ट होतं. त्यावेळी त्यांनी मला रोलबद्दल सांगितलं. तो रोल एक दिवसाचा होता".

पुढे ते म्हणाले, "त्यावेळी पोस्टवर माझा फोटो देखील लावला होता. अनिल कपूर, विकी कौशल तसेच रश्मिका मंदाना यांच्यासोबत माझा 'हरहर महादेव' चित्रपटातील फुलाजी प्रभूजी यांचा फोटो लावण्यात आला. चित्रपटात अनिल कपूर औरंगजेब करणार होते तर विकी कौशल छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत होता. तर मी त्यांना म्हटलं की लक्ष्मणराव हा चित्रपट मी करावा? त्यावर ते म्हणाले की माझी इच्छा आहे म्हणून कर. मग मी सांगितलं, माझं बॅगेज आहे.

## 'अबीर गुलाल' मालिका बंद होणार असल्याचं कळताच अक्षय केळकरला बसला धक्का





गेल्या काही महिन्यांपासून 'कलर्स मराठी' वाहिनीवर नव्या मालिकांचं सत्र सुरू आहे. पण दुसऱ्या बाजूला अवघ्या तीन, पाच आणि सहा महिन्यात या नव्या मालिका प्रेक्षकांना निरोप घेत आहेत. टीआरपी अभावी अचानक नव्या मालिका बंद केल्या जात आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'अबीर गुलाल'.

२७ मेपासून सुरू झालेली 'अबीर गुलाल' मालिका अवघ्या सहा महिन्यात ऑफ एअर होणार आहे. या मालिकेत अभिनेता अक्षय केळकर, पायल जाधव, गायत्री दातार प्रमुख भूमिकेत आहेत. अल्पावधीतच ही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडली. पण, आता अचानक बंद केली जाणार आहे. याबाबत दोन दिवसांपूर्वी कलाकार मंडळींना कळालं. याविषयी अक्षय केळकर काय म्हणाला? जाणून घ्या...

नुकताच अक्षय केळकरने 'कलाकृती मीडिया'शी संवाद साधला. यावेळी त्याला मालिकेच्या चित्रीकरणाबाबत विचारण्यात आलं. तेव्हा तो म्हणाला, "मालिकेचं चित्रीकरण कमाल सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी मालिका बंद होतेय कळालं. पण काम करताना एनर्जी तिच आहे. उरलेले काही दिवस आपल्याला कमाल घालवायचे आहेत. सहा वर्ष मालिका चालली असं मनातल्या मनात म्हणायचं आहे."

त्यानंतर अक्षय केळकरला मालिकासंपल्यानंतरच्या प्लॅनविषयी विचारलं. तेव्हा अक्षय म्हणाला, "आम्हाचा दोन दिवसांपूर्वी मालिका संपतेय कळालं. त्यामुळे दोन दिवसांत काय प्लॅन होणार. माझ्याकडे दोन स्क्रिप्ट पडून आहेत आणि तीन लाइन अप आहेत, असं काही नसतं."

तुला मालिका बंद होणार कळल्यावर धक्का बसला का? त्यावर अक्षय म्हणाला, हो. प्रश्नच नाही. पण, प्रत्येकाच्या बाजू आहेत. ती माणसं त्यांच्या त्यांच्या जागी योग्य असतात. हे आपण खूप समजूदार झाल्यानंतर कळतं. पहिल्या वेळी खूप वाईट वाटतं. पण आता मला तितकं वाईट वाटतं नाहीये. पण एक गोष्ट आहे, मला पुन्हा स्ट्रगल करावं लागेल. जे प्रत्येकाच्या वाटाल्या येतं. तुमच्या माध्यमातून सांगतो मी सध्या फ्री आहे."

दरम्यान, अक्षयच्या कामाबद्दल बोलायचं झालं, 'अबीर गुलाल' मालिकेआधी 'कलर्स मराठी'च्या 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमाच्या निवेदनाची जबाबदारी त्याने पेलली होती. तसंच अक्षयने हिंदी मालिकेतही काम केलं. शिवाय तो 'दोन कटिंग' या वेब फिल्ममध्ये समृद्धी केळकरबरोबर पाहायला मिळाला होता.

## अतुल परचुरेंच्या आठवणीत श्रुती मराठे भावुक



अभिनेत्री श्रुती मराठे सध्या तिचा आगामी चित्रपट 'गुलाबी'मुळे चर्चेत आली आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वेगवेगळया मालिका, चित्रपटांमध्ये तिने काम केलं आहे. अभिनेत्रीबरोबरच श्रुती निर्मातीदेखील आहे. श्रुतीने दिवंगत अभिनेते अतुल परचुरेंसोबत 'जागो मोहन प्यारे' या मालिकेत काम केलं. या मालिकेच्या माध्यमातून अतुल यांनी प्रेक्षकांना आपलंस केलं. दरम्यान, नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत श्रुती अतुल परचुरेंच्या आठवणीत भावुक झाल्याची पाहायला मिळाली.

श्रुती मराठेने नुकतीच 'लोकमत फिल्मी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने अतुल परचुरेंसोबतच्या आठवणींना उजाला दिला. त्या दरम्यान अभिनेत्री म्हणाली, "आमचं खूपच सुंदर बॉण्डिंग होतं. कारण प्रत्येक सीनमध्ये आम्ही दोघं असायचो. तो माझ्यासाठी सिनियर होता. मला कधीच असं वाटलं नव्हतं की आमची अशी मैत्री होईल. एकतर तो परुष आणि आमच्या वयातही बरंच अंतर होतं. शिवाय दोघांचा अनुभवही वेगळा".

## तू बाबांच्या कथेला पूर्ण न्याय दिलास, बाबासाहेब पुरंदरेंच्या मुलाने केलं प्राजक्ताचं कौतुक




प्राजक्ता माळी ही मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सध्या प्राजक्ता माळी चांगलीच चर्चेत आहे. त्याचं कारण म्हणजे 'फुलवंती'. सध्या प्राजक्ता माळीचा 'फुलवंती' सिनेमा लोकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत सुरु आहे. प्राजक्ता माळीने उत्कृष्ट अभिनय आणि नृत्याच्या जोरावर 'फुलवंती' सिनेमामध्ये प्रशंसनीय काम केलंय. नुकतंच प्राजक्ताने सोशल मीडियावर तिने सहकुटुंब 'फुलवंती'चा आस्वाद घेतल्याचं सांगितलंय.

प्राजक्ता माळीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केलीय. यात तिची संपूर्ण फॅमिली आणि बाबासाहेब पुरंदरे यांचा मुलगा आणि अभिनेते प्रसाद पुरंदरे सहभागी होते. प्राजक्ता पोस्ट करुन लिहिते की, "प्रसाद पुरंदरेंनी 'सकल ललित कलाघर' (पुणे) मध्ये फुलवंतीचा #specialshow आयोजित केला. संपुर्ण कुटूंबाबरोबर परत चित्रपट पहायचाच होता... सगळे घरचे जमले. पहिल्यांदा निव्वळ प्रेक्षक म्हणून चित्रपट पाहू शकले."

पुढे प्रसाद पुरंदरे प्राजक्ताचं कौतुक करताना म्हणाले की, "आज बाबा असायला हवे होते, त्यांना फार आनंद झाला असता. तू बाबांच्या कथेला पूर्ण न्याय दिलास." अशाप्रकारे प्रसाद यांनी प्राजक्ताचं कौतुक केलं.

## घर-बसल्या अशाप्रकारे तपासा रोगप्रतिकारक शक्ती



सुदृढ आणि निरोगी जीवन जगण्यासाठी रोगप्रतिकार शक्ती मजबूत असणे आवश्यक आहे. रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असेल तर अनेक आजारांची लागण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येकानं आपली रोगप्रतिकार शक्ती मजबूत करणे अत्यंत गरजेचं आहे. परंतु, तुम्हाला माहिती आहे काय, रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असेल किंवा त्यात काही गडबड असल्यास शरीर विशिष्ट सिग्नल देतो. हे चिन्ह ओळखल्यास आणि वेळेत समस्या सोडण्याचा प्रयत्न केल्यास भविष्यात तुम्ही अनेक गंभीर आजारांपासून दूर राहू शकता.

डॉक्टर काय म्हणतात? नवी दिल्ली येथील लाईफ हॉस्पिटलचे डॉक्टर अशरी कुरैशी यांच्या नुसार, शरीर निरोगी ठेवण्यासाठी रोगप्रतिकार शक्ती महत्त्वाची भूमिका बजावते. हे आपल्या शरीरातीला व्हायरस, बॅक्टेरिया आणि इतर हानिकारक पदार्थांच्या प्रभावापासून दूर ठेवते. कोणत्याही कारणानं रोगप्रतिकार शक्ती कमकुवत झाली तर गंभीर आजार आणि अपाय होण्याची शक्यता जास्त असते.

**कमकुवत रोगप्रतिकार शक्तीची लक्षणं**

वारंवार सर्दी: वारंवार सर्दी, नाक वाहणे ही कमकुवत प्रतिकारशक्तीची लक्षणं आहेत. निरोगी व्यक्तीला वर्षातून २ ते ३ वेळा सर्दी आणि फ्लू होऊ शकतो. परंतु रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असलेल्या व्यक्तींना वारंवार सर्दी होते.


**जखमा आणि फोड लवकर बरं होत नाहीत :** रोगप्रतिकार शक्ती शरीराचे संक्रमणांपासून संरक्षण करते. वारंवार संसर्ग होणे हे कमकुवत प्रतिकारशक्तीचे लक्षणं आहेत. संक्रमण विविध प्रकारचे असतात. जसे. कानाचा संसर्ग, सायनुसायटिस, फुफ्फुसाचा संसर्ग किंवा मूत्र संसर्ग आदी.

**थकवा आणि अशक्तपणा जाणवणे:** रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असल्यास व्यक्तीला सतत थकवा आणि कमजोरी जाणवते. काम करण्याची इच्छा होत नाही. विश्रांती घेऊन सुद्धा थकवा जाणवतो.

**पोटाच्या समस्या:** पचनसंस्था ही रोगप्रतिकार शक्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे. रोगप्रतिकार शक्ती कमकुवत झाल्यास पोटातील चांगले बॅक्टेरिया कमी होतात. परिणामी पोटाच्या समस्या उद्धवू लागतात. बद्धकोष्ठता, अपचन, पोटदुखी आणि गॅसची समस्या ही रोगप्रतिकार शक्ती कमकुवत होण्याची चिन्हे आहेत.

डॉक्टरांच्या मते तुम्हाला वरीलपैकी कोणतीही लक्षणं जाणवत असल्यास उशीर न करता डॉक्टरांचा सल्ला घ्या. तसंच रोगप्रतिकर शक्ती मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करा. याशिवाय योग्य आहार, पुरेशी झोप आणि नियमित व्यायाम करून रोगप्रतिकार शक्ती मजबूत करता येवू शकते.

## सौंदर्य प्रसाधनासाठी उपयुक्त वेलची



वेलची किंवा ज्याला इलायची असंही म्हटलं जातं. हा भारतीय स्वयंपाकघरातील एक मसाल्याचा पदार्थ आहे. यामध्ये अँटिऑक्सिडंटस, व्हिटामिन्स आणि मिनरल्स असतात. जे त्वचेला नैसर्गिक पद्धतीने स्वच्छ करतात. आणि चेहऱ्यावरची चमकही वाढवतात. या लेखातून जाणून घेऊयात वेलचीचा कसा वापर केला जातो आणि याचे काय-काय फायदे आहेत याबद्दल.

**१. वेलची आणि मधाचा फेस मास्क :**

मध आणि वेलची दोघांमध्येही अँटिबेक्टेरियल आणि अँटिइंफ्लेमेटरी गुण असतात. जे मुरूमे आणि पिंपल्स यांच्यापासून आराम देऊ शकतात. हा फेस मास्क त्वचेला मुलायम आणि स्वच्छ बनवतो.

**कसा कराल वापर ?**

- २-३ वेलचीचे दाणे घ्या आणि त्यांना बारीक वाटून घ्या.
- आता यामध्ये १ चमचा मध टाकून नीट मिक्स करून घ्या.
- ही पेस्ट चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटांसाठी लावा.
- पेस्ट सुकल्यानंतर हलक्या कोमट पाण्याने चेहरा धुवून घ्या.

**२. वेलची आणि नारळ तेलाचा फेस मास्क :**

नारळाचे तेल आणि वेलचीचे मिश्रण त्वचेला मुलायम बनवते.हा स्क्रब विशेषत: कोरड्या त्वचेकरता फायदेशीर आहे.

**कसा कराल वापर ?**

- काही वेलचीच्या दाण्यांना मिक्सरमध्ये वाटून घ्या आणि त्यांची पावडर तयार करा.
- आता यात १ चमचा नारळाचे तेल टाका.
- या मिश्रणाला चेहऱ्यावर लावत हलक्या हातांनी मसाज करा.
- ५ ते १० मिनिटांसाठी मसाज केल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.

**३. वेलची आणि गुलाबजलाचा फेस टोनर :**

गुलाबजल त्वचेला ताजेपणा देतो. तर वेलची त्वचेला साफ करण्याचे काम करते. यामुळे त्वचा चमकदार बनते. तुम्ही याचा वापर टोनर म्हणूनही करू शकता किंवा पेस्ट म्हणूनही.

**कसा कराल वापर ?**

- ३ ते ४ वेलचीचे दाणे घ्या आणि त्यांना गुलाबजलामध्ये रात्रभरासाठी भिजवत ठेवा.
- दुसऱ्या दिवशी सकाळी हे मिश्रण गाळून घ्या आणि त्याला एका स्प्रे बाटलीमध्ये टाका.
- हे टोनर चेहऱ्यावर स्प्रे करा किंवा याला कापसाच्या मदतीने त्वचेवर लावा.

**४. वेलची आणि एलोवेरा जेल मास्क :**

एलोवेरा अर्थात कोरफड त्वचेला हायड्रेट करण्याचं काम करते आणि सूज व जळजळीपासून आराम देते. जेव्हा हे वेलचीसोबत मिक्स केले जाते. तेव्हा त्वचेला मुलायम करण्यासाठी आणि चमक वाढवण्यासाठी हे फायदेशीर ठरते.

**कसा कराल वापर ?**

- २ चमचे कोरफडीचे जेल घ्या.
- यामध्ये चिमूटभर वेलची पावडर मिसळा.
- या मिश्रणाला चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांसाठी असेच राहू द्यात.
- यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.




**मेष** – जोडीदाराचा वरचष्मा राहील. ठरवलेले काम वेगाने पूर्ण कराल. अपेक्षित व्यक्ती भेटेल. प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल.

**वृषभ** – महत्त्वाचे काम करून घ्या. भागीदारीत मतभेद संभवतात. कोर्टाच्या कामात प्रगती होईल. धंद्यात काम मिळवा. वसुली होईल.

**मिथुन** – विरोधक मैत्री करण्यास येतील. कामातून समाधान लाभेल. आपल्या हाताखालील लोकांचे उत्तम सहकार्य मिळेल.

**कर्क** – वाटाघाटीत यश मिळेल. कल्पनाशक्ती वाढेल. संगीत कलेत विशेष मन रमेल. नातेवाईकांची नाराजी दूर करावी लागेल.

**सिंह** – नातलगांच्या मदतीला जावे लागेल. कल्पनेत रमून जाऊ नका. खर्च होईल. महत्त्वाची वस्तू नीट जागेवर ठेवा. काम वाढेल.

**कन्या** – जुने स्नेही भेटतील. जीवनसाथीच्या मदतीने कठीण काम पूर्ण करता येईल. संपर्कातील लोकांशी घनिष्ठता वाढेल.

**तूळ** – घरगुती वातावरण प्रसन्न राहील. जास्त कामाची जबाबदारी येऊ शकते. दुर्लक्ष करू नका. छोटीशी चूकही महागात पडेल.

**वृश्चिक** – खंबीरपणे प्रश्न सोडवाल. तुमचे मत पटवून देता येईल. विचारांच्या गर्दीत भरकटू नका. कौटुंबिक सौख्याला प्राधान्य द्याल.

**धनु** – धंद्यात जम बसेल. कोर्टकेस जिंकाल. कला-क्रीडा स्पर्धेत चमकाल. आपली तब्येत सांभाळा. कृतीला अधिक महत्त्व द्यावे.

**मकर** – मान-प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल. नवे परिचय उत्साहवर्धक ठरतील. आततायीपणे वागू नका. कामाची योग्य दिशा ठरवा.

**कुंभ** – घरगुती जबाबदारी उत्तमरीत्या पेलाल. अनाठायी खर्च होऊ शकतो. कामात क्षुल्लक अडथळे येतील. वरिष्ठांची मदत घ्या.

**मीन** – एखाद्या क्षुल्लक गोष्टीसाठी अडून राहू नका. आवडत्या गोष्टीत रमून जाल. नवीन मित्र जोडले जातील. कर्तृत्वाला वाव मिळेल.

# सुरक्षा नियमांचं पालन केल्यास स्टारलिंकला परवानगी - ज्योतिरादित्य सिंधिया

**मुंबई (राकेश गायकवाड) :** सुरक्षा नियमांचं पालन केल्यानंतर इलॉन मस्क यांच्या स्टारलिंकला कंपनीला भारतात ऑपरेट करण्याची परवानगी दिली जाणार आहे. भारतातील सॅटेलाइट ब्रॉडबँड सारख्या सेवांसाठी एलोन मस्कच्या स्टारलिंकसह इतर कंपन्यांना परवाना देण्याच्या मुद्द्यावर केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मोठी टिप्पणी केली आहे.

केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मंगळवारी सांगितलं की, उद्योगपती एलोन मस्क यांच्या मालकीच्या स्टारलिंकला भारतात परवाना मिळविण्यासाठी सर्व नियमांचं पालन करावं लागेल. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना परवाना मिळेल. यावेळी ते म्हणाले की, सॅटेलाइट ब्रॉडबँड सेवांसाठी परवाने स्टारलिंकसह कोणालाही परवानगी दिलं जाऊ शकते, मात्र त्यांनी सर्व सुरक्षा मापदंडांची पूर्तता करायला हवी. "आमच्याकडं एक निश्चित स्वरूप आहे. जर तुम्ही सर्व अटी पूर्ण केल्या तर तुम्हाला परवानगी मिळेल. जर कंपन्यांनी या मार्गदर्शक तत्त्वांचं पालन केलं तर आम्हाला खूप आनंद होईल.

“स्टारलिंकला परवाना मिळविण्यासाठी सर्व नियमांचे पालन करावे लागेल. सुरक्षेच्या




दृष्टिकोनातूनही याकडं पाहावं लागेल. सर्व नियम पूर्ण झाल्यानंतर त्यांना परवाना मिळेल - ज्योतिरादित्य सिंधिया, केंद्रीय दूरसंचार मंत्री

यापूर्वी, सिंधिया यांनी सांगितलं होतं की, सॅटेलाइट ब्रॉडबँड स्पेक्ट्रम विनामूल्य दिलं जाणार नाही. टेलिकॉम नियामक ट्राय त्याची किंमत ठरवेल. "प्रत्येक देशाला इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियन चे अनुसरण करावं लागेल, जी अंतराळ किंवा उपग्रहांमध्ये स्पेक्ट्रमसाठी धोरण तयार करणारी संस्था आहे.

भारत आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ चा सदस्य आहे, डिजिटल तंत्रज्ञानासाठी युनायटेड नेशन्स एजन्सी. मस्कच्या स्टारलिंक आणि ॲमेझॉनच्या प्रोजेक्ट कुईपरसारख्या जागतिक समकक्षांनी लिलाव वाटपाचं समर्थन केलं आहे. दरम्यान, अंबानीच्या रिलायन्स जिओने एअरवेव्ह खरेदी करणाऱ्या आणि टेलीकॉम टॉवर्ससारख्या पायाभूत सुविधा उभारणाऱ्यांना लिलावाद्वारे स्पेक्ट्रम वाटप करण्याची गरज आहे. एअरटेलच्या मित्तल यांनी गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील उपस्थित असलेल्या कार्यक्रमात अशा वाटपासाठी बोली लावण्याच्या गरजेवर भर दिला होता.

# झोपेत असतानाच डोक्यात दगड घालून पत्नीचा खून

**सांगली (सुचिता देशमुख) :** पत्नी झोपेत असतानाच पतीने घरगुती वादातून डोक्यात दगड घालून तिचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार मंगळवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास चिकुर्डे (ता. वाळवा) येथे घडला. खुनानंतर स्वत: पती पोलिस ठाण्यात हजर झाला.

कविता उत्तम बुरशे पाटील (वय ४२) असे मृत महिलेचे नाव तर संशयित उत्तम विष्णू बुरशे पाटील (वय ५२) असे पतीचे नाव आहे. कुरळप पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक सुनील माने, राजेंद्र जाधव, दीपक खोमणे व फॉरेन्सिक लॅबचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर त्यांनी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरज सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आला.

त्यांना एक मुलगी, मुलगा असा परिवार आहे. मुलगी डिप्लोमाला, तर मुलगा डिग्रीच्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. ही दोन्ही मुले बाहेरगावी राहायला असल्याने सध्या कविता व उत्तम हे दोघेच चिकुर्डे येथे वास्तव्यास आहेत. यांच्यामध्ये वारंवार किरकोळ





कारणावरून वाद होत होते.

उत्तम यांच्या स्वभावात बदल होत नसल्याने दोन महिन्यांपूर्वी कविता या करंजवडे या त्यांच्या माहेरी निघून गेल्या होत्या. मात्र, उत्तम याने मी परत भांडण करणार नाही, असे सांगून कविता यांना मागील महिन्यात घरी घेऊन आला होता. नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री पुन्हा दोघांमध्ये किरकोळ वाद झाला. यामुळे उत्तम याने मंगळवारी पहाटे कविता या झोपेत असतानाच घराबाहेरील मोठा दगड आणून तिच्या डोक्यात घालून खून केला व घरात नळाचे पाणी भरून व अंघोळ करून भावकीतील काही लोकांना खून केल्याचे सांगत कुरळप पोलिसांत हजर झाला.

## SPORT

# Rohit Sharma still in Mumbai, no clarity on departure for Australia: ‘He is doing what any father would do’

**New Delhi -** Where is Rohit Sharma? Will he play the first Test of the Border-Gavaskar Trophy that starts on November 22 in Perth? If yes, then why hasn’t he travelled to Australia yet?

When the rest of the Indian players were busy with their training sessions at the WACA, questions about India’s captain, Rohit, got louder than ever before. There is still no clarity on Rohit’s availability for the series opener in Perth but the answer to the first question came on Wednesday.

Rohit himself put an end to the speculations about his whereabouts (at least some of it) by posting a photo on Instagram. The Indian captain was training in Mumbai at the Reliance Corporate Park (RCP). The Times of India reported that Rohit has also been using the facilities at the Mumbai Cricket Association (MCA) to keep himself ready for the challenge.

As far as his travel to Australia is concerned, he will only take that call after the birth of his second child.

“There is no clarity yet on his departure. It all depends on how things unfold on the personal front. He is doing what any father would at this stage, which




is to stay with his wife and family. But at the same time, he is ensuring to be well-tuned for the Test series and will be batting at every possible opportunity in Mumbai,” a source aware of the developments was quoted as saying by TOI.

The Indian cricket team departed for Perth in two groups, with the first group leaving from Mumbai on November 10 and the second on November 11. Shubman Gill, Yashasvi Jaiswal, Mohammed Siraj, Akash Deep, and Washington Sundar flew out with assistant coach Abhishek Nayar on November 10, while head coach Gautam Gambhir and the remaining players travelled the following day.

Virat Kohli was the first player to arrive in Perth, reaching on Sunday evening. He was seen at the Mumbai airport late Saturday with his wife Anushka Sharma and their two children. Notably, vice-captain Jasprit Bumrah did not travel with the second group, opting to leave on Monday night instead.

The team management has already prepared to walk out to the park without their designated captain. Head coach Gautam Gambhir confirmed that fast bowler Jasprit Bumrah, who is the designated vice captain, will take the lead in Rohit Sharma’s absence. There are two contenders for the opener’s slot - Abhimanyu Easwaran and KL Rahul. The latter, because of his experience and proven track record in Australian conditions, is ahead in the race.

The much-anticipated series kicks off in Perth on November 22 and will conclude with the Sydney Test starting on January 3. Before the second Test in Adelaide, which will be a Day-Night match, the team will also play a two-day game in Canberra.

# Parthiv Patel Joins Gujarat Titans’ Support Staff As Batting And Assistant Coach



**New Delhi -** Gujarat Titans have entrusted former India keeper-batter Parthiv Patel with the dual responsibility of serving as their assistant and batting coach in the upcoming IPL, the franchise said on Wednesday.

Parthiv will perform the dual role in the support staff led by head coach Ashish Nehra.

“The Gujarat Titans are pleased to announce the appointment of Parthiv Patel as their new assistant and batting coach. With a distinguished 17-year career as a former Indian wicket-keeper-batter, Parthiv brings a wealth of experience and knowledge to the team,” the franchise said in a statement.

“As the Titans prepare for the upcoming Indian Premier League (IPL) season, Parthiv’s insights into batting techniques and strategies will play a crucial role in enhancing the players’ skills. “Parthiv, who is known for his sharp cricketing acumen and ability to mentor young talent, will strengthen the coaching staff and contribute to player development and performance,” GT added in the statement.


This is the first coaching role in the IPL for Parthiv, who retired in 2020.

Right after his retirement, he served as talent scout for Mumbai Indians for three seasons until 2023, and also the batting coach for MI Emirates in the inaugural season of ILT20.

# Arjun Tendulkar sends roaring message to IPL franchises with maiden first-class fifer

**New Delhi -** Arjun Tendulkar, son of legendary cricketer Sachin Tendulkar, made a statement on Wednesday after he picked up his maiden five-wicket haul in first-class cricket for Goa against Arunachal Pradesh in the ongoing Ranji Trophy 2024. Arjun ran through the Arunachal batters, putting his team Goa in a commanding position of the first day of action.

Arjun, who was released by Indian Premier League (IPL) franchise Mumbai Indians couple of weeks back during the announcement of the retention and released list, send a roaring message to all the IPL franchises ahead of the mega auction 2025. The 2025 mega auction will take place on November 24 and 25 in Jeddah, where franchises will get a chance to complete their respective sides and with Arjun showcasing his class just days




ahead, the Mumbai lad has a bright chance of getting picked up by any of the franchises.

With the help of his maiden five-wicket haul, Goa ended the first day on top as they bowled out Arunachal Pradesh for a paltry score of just 84 runs. Arjun claimed figures of 5/25, dismissing players like Neelam Obi, Nabam Hachang, Chinmay Patil, Jay Bhavsar and Moji Ete. He was supported by Mohit Redkar and Keith Pinto with 3 and 2 wickets respectively as the entire Arunachal side folded in 30.3 overs.

Meanwhile, Arjun made his IPL debut in 2023 for Mumbai Indians and picked a total of three wickets in four matches in the entire season. In the 2024 season, Mumbai acquired his services again for Rs 30 lacs but he played just a lone match in the entire season with no wickets. Ahead of the auction this season, he was released by the franchise. Arjun, in all likelihood, will be part of the IPL 2025 mega auction. Time will only tell that which teams decides to take his service for the 18th edition of the cash-rich league.

# Virat Kohli’s future in team India made public by Suresh Raina

**New Delhi -** Former Indian batter Suresh Raina has come in support of star batter Virat Kohli ahead of the Border-Gavaskar Trophy (BGT 2024-25) in Australia.

Suresh Raina said that it is unfair to judge Kohli’s form based on the home season amid severe criticism across the world regarding his performance.

Kohli was last seen in action during the three-match home Test series against New Zealand, where the Rohit Sharma-led team suffered a humiliating 0-3 whitewash. The batter scored only 93 runs in six innings at an average of 15.50. He will be under pressure in Australia after his recent struggles in Tests.

Suresh Raina said that New Zealand deserves credit for whitewashing the Indian team, adding that they played well during their recent series. He stated that the Black Caps’ spinners and overall gameplay outperformed India. Raina said that we can’t judge Virat Kohli’s form from one series.

“We need to give credit to New Zealand (for the whitewash). They played really well...Their cricketing ethics are very strong, in every sport. They played better than us, had good spinners... but we couldn’t score much. Virat is doing really well, I think. We can’t judge him from one series,” Raina said in an interview with



the Times of India.

Virat Kohli arrived in Australia early to prepare for the Border-Gavaskar Trophy. He skipped an optional training session on Tuesday, November 12, while players like KL Rahul, Rishabh Pant, and Yashasvi Jaiswal were seen practicing. Kohli is expected to start his practice on Wednesday, November 13.

Suresh Raina emphasized that Kohli will play a key role in the upcoming series and recalled his remarkable form during the 2014-15 Australia tour, where he scored four centuries, including two in the Adelaide Test. Raina said Kohli was confident back then, despite his current challenges with form.

“The most important role will be of Virat Kohli. I remember when we went there in 2014-15, Virat made four hundreds. And at that time, all top cricketers were playing. I remember he made hundreds in both the innings of the Adelaide Test. I didn’t play that game but was sitting outside and saw his ruthless approach. He was so strong with his body language,” Raina said.

Virat Kohli has an impressive record against Australia in Test matches, with 2,042 runs from 25 matches at an average of 47.48, including five half-centuries and eight centuries.

The 36-year-old has scored 1,352 runs in 25 innings in Australia at an average of 54.08. His standout performance came in the 2014-15 series, where he accumulated 692 runs at an average of 86.50.

The first Test of the five-match series is set to be played at Perth Stadium in Perth, starting on Friday, November 22. Both teams will be hoping to start their campaign with a victory during the series opener.

# नकली अधिकाऱ्यांच्या टोळीनं व्यापाऱ्याचे लुटले २५ लाख, निवडणुकीच्या धामधुमीत घडला गुन्हा

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

राज्यात एका बाजूला विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. यासाठी पोलिसांपासून शासकीय यंत्रणा रात्रंदिवस कामाला लागली आहे. असे असताना दुसऱ्या बाजूला पोलीस व्यस्त असल्याचा फायदा आता काही लुटारू टोळी घेताना पाहायला मिळत आहे. कोल्हापुरात अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्ह्यात प्रवेशद्वारावर निवडणूक आयोगाकडून तपासणी पथक उभे करण्यात आलं आहेत. याचा फायदा एका लुटारू टोळीनं घेतला.

शासनाच्या तपासणी पथकांकडून सुरू असलेल्या तपासणीची हुबेहूब नक्कल करून शासनाच्या तपासणी नाक्याच्या आधीच काही अंतरावरच बोगस पथकानं एका व्यावसायिकाची २५ लाख ५० हजारांची रोकड लांबविली आहे. हा प्रकार काल मंगळवारी (दि. १२) रोजी पहाटे पुणे-बंगळुरू महामार्गाजवळ असलेल्या तावडे हॉटेल उड्डाणपुलाजवळ घडला. यामुळे पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. माहिती कळताच पोलिसाची 5 पथके संशयितांचा शोध घेण्याकरिता रवाना करण्यात आले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुभाष लक्ष्मण हारणे (वय ५०, रा. बागल चौक, शाहूपुरी, कोल्हापूर) हे व्यापारी आहेत. ते यात्रेत पाळणे लावण्याचा व्यवसाय करतात. ते रोजच्या प्रमाणे सोमवारी काम केलेल्या कामाची रक्कम घेऊन मंगळवारी पहाटेच्या ५ ते ५:२० च्या सुमारास कारमधून तावडे हॉटेलच्या दिशेने आले. पहाट असल्यानं अजून अंधार होता. दरम्यान, २५ ते ३० वयोगटातील अज्ञात पाच जणांच्या टोळीने सुटबुट घालत आणि शासकीय अधिकाऱ्यांचे नकली



ओळखपत्र गळयात अडकवून सर्व्हिस रोडला हारणे यांची कार अडवली. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तपासणी सुरू असल्याचे सांगत कारची तपासणी करणार असल्याचे सांगितले. दोघा-तिघांनी कारची झडती सुरू केली. त्यावेळी गाडीत २५ लाख ५० हजार रुपये ठेवलेली बॅग बोगस अधिकाऱ्यांच्या हाती लागली.

आचारसंहिता काळात एवढी रक्कम तुम्ही घेऊन जाऊ शकत नाही, असे सांगून त्यांनी कारवाईची भीती दाखवली. हारणे यांनी त्यांना हे आपल्या व्यवसायाचे पैसे असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र या टोळक्याने त्यांना आपल्या कारमध्ये बसवून ते सरनोबतवाडीच्या दिशेने घेऊन गेले. तिथे त्यांच्याकडील रोकड आणि मोबाइल काढून घेऊन पसार झाले. या सर्व घटनेनंतर आपली फसवणूक झाल्याचे हारणे लक्षात येताच त्यांनी थेट गांधीनगर पोलिस ठाणे गाठले. घडलेली हकीकत सांगून तक्रार दाखल केली.

जिल्ह्यात दीडशेहून अधिक तपासणी पथके शहरांच्या वेशीवर २४ तास काम करत आहेत. तावडे हॉटेल परिसरात शहराच्या प्रवेशद्वारावरच एक अधिकृत स्थिर तपासणी पथक आहे. मात्र त्याच्या अलीकडेच महामार्गाच्या पलीकडेच सर्व्हिस रोड लगत तिथून थेट बोगस शासकीय अधिकारी बनत तोतया टोळीने केलेल्या सिनेस्टाईल या लुटीमुळे पोलीस दलात आणि शासकीय अधिकाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखत अपर पोलीस अधीक्षक जयश्री देसाई, करवीरचे उपविभागीय अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक रवींद्र कळमकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. गांधीनगरचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक जाधव यांनी तपासाच्या सूचना देत गांधीनगर आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची पाच पथके तपासासाठी रवाना झाली. मात्र, या लूटमारच्या प्रकारामुळे सध्या व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलीस निरीक्षक दीपक जाधव यांनी संशयित गाडीची ओळख पटली असून पुढील तपास सुरू असल्याचं सांगितले. गाडी आणि लूट करणारी टोळीतील संशयितदेखील कोल्हापुरातीलच असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. तसेच एलसीबी आणि गांधीनगर पोलीस ठाण्याची गुन्हे शाखा अन्वेषणची टीम वेगानं तपास करत आहे. आजूबाजूचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासून फूटेज ताब्यात घेण्यात आले आहेत.

## मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर ट्रेलरने दिली तीन वाहनांना जोरदार धडक..




● खोपोली , दिगंबर जाधव :

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवर आज सकाळी एका ट्रेलरने पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या कंटेनर, टेम्पो ट्रेलर या तीन वाहनांना जोरदार धडक दिल्याने चार वाहनाचा विचित्र अपघात झाला, झाला या अपघातात ट्रेलर चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे,

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवरून पुण्याहून मुबंई कडे ट्रेलर क्रमांक (HR ३९ ई ५२०३) हा जातं असताना तो बोरघाटात ढेकू जवळ आला असता त्याचे ब्रेक फेल झाल्याने त्याने पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या कंटेनर क्रमांक (एमएच ४६बीएम ११०६)ला पाठीमागून जोरदार धडक दिली, तर पुढे असणाऱ्या टेम्पो क्रमांक (डीडी ०३ पी २९८९) आणि ट्रेलर क्रमांक (एमएच १२ व्हीटी २९८९)यांना घासून अपघात झाला यात ट्रेलर चालक पवन कुमार यांस गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला, एक जण किरकोळ जखमी झाला आहे,

या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, आयआरबी टीम देवदूत टीम, अपघात ग्रस्त टीमचे सदस्य सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रेलर मध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढले तर अपघात ग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेण्यात आली.

# मुंबई २० अंशांवर, राज्यात थंडीचा कडाका होतोय सुरू!



● मुंबई, विशाल पाटील :

मुंबईचे किमान तापमान मंगळवारी २० अंश नोंदविण्यात आले आहे. बुधवारीही मुंबापुरीच्या किमान तापमानाचा पारा २० अंशाच्या आसपास राहील. त्यामुळे मुंबईकरांना आजही थंडीचा आनंद लुटता येणार असून, गुरुवार ते रविवारीदरम्यान मुंबईच्या तापमानात वाढ होईल. पुन्हा सोमवारनंतर किमान तापमानात घट होण्यास सुरुवात होईल. २० नोव्हेंबरनंतर मुंबईकरांना थंडीचा पुरेपूर आनंद घेता येणार आहे.

दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग) आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती मुंबई प्रादेशिक हवामान शास्त्र विभागाच्या वतीने देण्यात आली. राज्यात काही ठिकाणी किमान तापमानाचा खाली घसरण्यास सुरुवात झाली आहे. यात अहमदनगर, जळगाव, महाबळेश्वर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, सातारा आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांचा समावेश आहे.

# लांब पल्ल्याच्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी, क्रूझ मिसाईलनं साधला लक्ष्यावर अचूक निशाणा !

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं मंगळवारी एक नवा विक्रम केलाय. ओडिशातील चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी श्रेणीवरून प्रथमच जमिनीवर हल्ला करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. हे जहाजविरोधी बॅलिस्टिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे. त्याची रेंज एकहजार किलोमीटरपर्यंत आहे. संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, क्षेपणास्त्राच्या सर्व उपप्रणालींनी चांगली कामगिरी केलीय. या यशाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही डीआरडीओचे अभिनंदन केलं आहे.




संरक्षण मंत्रालयानं सांगितलं की, क्षेपणास्त्राने पॉइंट नेव्हिगेशनचा वापर करून आपल्या मार्गाचा अवलंब केलाय. वेगवेगळया उंचीवर आणि वेगाने उड्डाण करताना आपली क्षमता क्षेपणास्त्रानं प्रदर्शित केलीय. या क्षेपणास्त्रात अत्याधुनिक एव्हीओनिक्स आणि सॉफ्टवेअरही आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने ओडिशातील एकात्मिक चाचणी श्रेणी चांदीपूर येथून मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचरमधून लांब पल्ल्याच्या लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्राची पहिली चाचणी घेतली.

रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम आणि टेलीमेट्री यांसारख्या अनेक श्रेणी सेन्सर्सद्वारे क्षेपणास्त्राच्या कामगिरीचं परीक्षण केलं गेलं. चाचणीवेळी डीआरडीओचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि तिन्ही लष्कराचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे क्षेपणास्त्र बेंगळुरूच्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट, DRDO आणि इतर भारतीय उद्योगांच्या सहकार्यानं विकसित केलं आहे. हैदराबादस्थित भारत डायनॅमिक्स लिमिटेड आणि बंगळुरूची भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या कंपन्यानी देखील या प्रकल्पात भाग घेतलाय.

हे क्षेपणास्त्र मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचर वापरून जमिनीवरून आणि युनिव्हर्सल व्हर्टिकल लाँच मॉड्यूल सिस्टमद्वारे फ्रंटलाइन जहाजांना जोडलं जाऊ शकतं. क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, सशस्त्र दल आणि उद्योगसमूहाचे अभिनंदन केलंय. यामुळं भविष्यात स्वदेशी क्रूझ क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमांचा मार्ग मोकळा होईल, असं ते म्हणाले. हा संरक्षण अधिग्रहण परिषदेनं LRLLACM मंजूर केलेला मिशन मोड प्रकल्प आहे.

# 'कार्तिकी' निमित्त शेगावात भाविकांची मांदियाळी

● बुलढाणा, सचिन कदम :

विदर्भ पंढरी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानासह श्री क्षेत्र पंढरपूर शाखेत कार्तिक एकादशी सोहळा पारंपरिक उत्साहात साजरा झाला. कार्तिकीनिमित्त संतनगरी शेगावात हजारो आबालवृद्ध भाविकांची मांदियाळी दिसून आली. श्रींचे मंदिरात ५० हजाराचेवर भाविकांनी समाधीचे दर्शन घेतले. ३० हजारावर भक्तांनी संस्थानच्या मोफत महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्रीं च्या दर्शनासाठी प्रत्यक्ष दर्शन आणि मुख दर्शनासाठी जिल्ह्यासह दूरवरून आलेल्या भाविकांच्या पहाटे पासून दीर्घ रांगा लागल्याचे दिसून आले. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जाऊ न शकणारे भाविक शेगावी येऊन गजानन महाराजांचे दर्शन घेतात. यंदाही ही परंपरा कायम राहिली. दूरवरून येणाऱ्या भाविकांच्या निवासाची आणि महाप्रसादची



शेगाव संस्थांनच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सुविधेसाठी शेकडो सेवेकरी तैनात करण्यात आले होते.शेगाव शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

श्री क्षेत्र पंढरपूर शाखेव्दारा श्री गजानन महाराज मठामध्ये दशमी, एकादशी व बारस या कालावधीत १ लाख १९ हजारावर भक्तांना महाप्रसाद वितरीत करण्यात आला. तसेच वारी निमित्त पंढरपूर शाखेत आलेल्या ७४ दिंड्यांपैकी नियमाची पूर्तता केलेल्या ७० भजनी दिंड्यांना भजन साहित्यासह वाद्यांचे वितरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी धर्मार्थ ॲलोपॅथीक रूग्णालयाचे माध्यमातून ६००० भाविकांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला आहे. आतापर्यंत संस्थेव्दारा शेगांव, पंढरपूर, आळंदी व त्र्यंबकेश्वर या तीर्थक्षेत्री महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, तेलंगणा अशा ९ राज्यामधील ७७ जिल्ह्यातून आलेल्या २० हजार १७७ गावांना भजनी साहित्य वितरण करण्यात आले आहे. शाखेत भाविकांसाठी भक्तनिवासात निवास व भोजनप्रसादाची व्यवस्था कार्यरत आहे. शिवाय रात्री उशीरा येणाऱ्या भक्तांसाठी सुद्धा महाप्रसादाचे विनामुल्य वितरण करण्यात येते. तसेच श्री प्रगटदिन, श्रीरामनवमी व श्री ५०० विद्यार्थ्यांना दररोज माधुकरीचे वितरण देखील करण्यात येते. कार्तिक व आषाढी वारीचे वेळेस महाराष्ट्रासह परराज्यातून आलेल्या व नियमांची पूर्तता केलेल्या भजनी दिंड्यांना १० टाळजोड, १ विणा, १ मृदंग, १ हातोडी असे भजनी साहित्य व श्री ज्ञानेश्वरी, श्री तुकाराम महाराज गाथा व श्री एकनाथी भागवत या संत वाद्यांचे वितरण करण्यात येते.

## शेतकऱ्यांवर भात पिकांची राखण करण्याची वेळ

# रानडुकरे करताहेत भात पिकांचे नुकसान

● उरण, धनश्री सट्टा :

यंदा परतीच्या पावसाने भात पिके तयार होण्याच्या अखेरच्या वेळेला दररोज सायंकाळच्या वेळेला बरसायला सुरुवात केल्याने भात पिके संकटात सापडली होती. आता पाऊस माघारी गेल्याने शेतकऱ्यांनी भात कापणी, बांधणी, झोडणीच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र शेतमजुरांच्या अभावी शेतकऱ्यांच्या भात पिकांच्या कापणीची कामे लांबवली आहेत.



शेतमजूर वेळेवर मिळत नसल्यामुळे शेतकरी रडकुंडीला आला आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या भात पिकांवर आता जंगली रानडुकरे मोकाट गुरे आणि जंगली वानरांचा मुक्त संचार होत असल्यामुळे, चिरनेर गावासह परिसरातील अन्य गावातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. या प्राण्यांची वक्रदृष्टी पडल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे. भातशेती कापणीला आली असताना, मजुरांच्या तुटवड्यामुळे शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. येथील काही शेतकऱ्यांच्या भात पिकांची रानडुकरांनी एवढी नासाडी केली आहे की, ही भातपिके कापणी बांधणीच्या लायक राहिली नसल्यामुळे शेतकऱ्यांनी नासाडी झालेल्या भात पिकांची कापणीच केली नसल्याचे येथील शेतकरी कृष्णा म्हात्रे, दिनेश म्हात्रे यांनी सांगितले.

# 'या' १५ जिल्ह्यांना १५ नोव्हेंबरला सतर्कतेचा इशारा !



● नागपूर, नितीन देवळेकर :

भारतीय हवामान खात्याने १५ नोव्हेंबरनंतर राज्यात हुडहुडी भरवणाऱ्या थंडीचा इशारा दिला होता, पण हे काय..! आता १५ नोव्हेंबरला हुडहुडी भरवणारी थंडी नाही तर राज्यातील १५ जिल्ह्यांना पाऊस ओलाचिंब करुन जाणार आहे. एवढेच नाही तर वादळी वारा आणि विजांचा कडकडाट देखील होणार आहे.

मोसमी पावसाने निरोप घेतला आणि राज्यात उशिरा का होईना गुलाबी थंडीला सुरुवात झाली. मोसमी पाऊस परतीच्या वाटेवर असताना अवकाळी पावसाचे डोकावणे सुरुच होते. मात्र, अखेर दिवसा ऊन आणि सायंकाळपासून ते पहाटेपर्यंत हलक्या थंडीला सुरुवात झाली होती. विशेषकरुन दिवाळीनंतर हवामानात प्रचंड वेगाने बदल होऊ लागले. राज्याच्या तापमानात चढउतार दिसून येत असतानाच हवेतील गारठा देखील वाढल्याचे जाणवत आहे. त्यामुळे राज्यात हुडहुडी भरवणारी थंडी लवकरच येणार असे संकेत हवामान खात्याने दिल्यानंतर गरम कपड्यांच्या खरेदीकडे देखील लोकांचा ओघ वाढू लागला होता. राज्यात खऱ्या अर्थाने हिवाळयाला सुरुवात होणार या आनंदात नागरिक असताना अवकाळी पावसाने डोके वर काढले. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाच्या सरी कोसळणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले. प्रामुख्याने शुक्रवार, १५ नोव्हेंबरला हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना 'येलो अलर्ट' जाहीर केला आहे.

गुरुवारपासूनच राज्याच्या दक्षिण भागापासून कोकणासह मध्य महाराष्ट्रात देखील पावसाच्या सरींचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोकण, पालघर, मध्य महाराष्ट्र, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, धुळे, नगर, पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर यासह विदर्भातील बुलढाणा, गडचिरोली, वाशिम, चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# नुकसानीमुळे कांदा उत्पादक, तर दरवाढीमुळे ग्राहक त्रस्त

● नाशिक, भावना जैन :

किरकोळ बाजारात कांद्याने शंभरी गाठल्याने ग्राहकांना तो खरेदी करताना हात आखडता घेण्याची वेळ आली आहे. परतीच्या पावसाने जिल्ह्यात १३ हजार हेक्टरवरील कांदा पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे दिवाळीनंतर बाजारात होणारी नव्या लाल कांद्याची आवक लक्षणीय घटली. याचा परिणाम घाऊक बाजारात कांदा सरासरी ४२ ते ६० रुपये प्रति किलोवर गेला आहे. सद्यस्थितीत उत्पादन खर्च भरून निघाला तरी बरं, अशी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भावना आहे.

एरवी उन्हाळ कांदा संपुष्टात येण्याची वेळ (सप्टेंबर, ऑक्टोबर) आणि नवीन लाल कांदा बाजारात (नोव्हेंबर) येण्याची वेळ यामधील काळात कांद्याचे दर वधारतात, असा अनुभव आहे. या वर्षी परतीच्या पावसाने कांद्याचे चक्र बिघडले. ऑक्टोबर महिन्यात चांदवड, देवळा,



पेठ, सिन्नर, नाशिक व निफाड भागास परतीच्या पावसाने झोडपले होते. सुमारे १३ हजार हेक्टरवरील कांद्याचे नुकसान झाले. ज्यांनी आधी लागवड केली होती, त्यांचा कांदा आता काढणीवर येणार होता. शेतात पाणी साचल्याने तो खराब झाला. सिन्नरमध्ये एका शेतकऱ्याला शेतात ट्रॅक्टर फिरवण्याची वेळ आल्याचे महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सांगितले. एरवी, नोव्हेंबरपासून लाल कांद्याची आवक वाढू लागते. परंतु, या परिस्थितीमुळे चालू महिन्यात आवक जेमतेम राहील. डिसेंबरपासून कांद्याची आवक वाढण्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

शहरी भागात कांदा १०० रुपयांवर गेल्यामुळे गृहिणींनी खरेदी करताना विचार करावा लागतो. लहान आकाराचे कांदे ७० रुपयांना आहेत. सध्या घरात कांद्याचा जपून वापर होत आहे. आधी पाच, सहा किलो कांदा खरेदी केला जायचा. आता तो एक, दोन किलोच खरेदी करावा लागतो. कांद्यासह भाजीपाल्याची ही स्थिती असल्याचे गृहिणी गायत्री पारख यांनी सांगितले. नाशिकमधील मिसळ या आवडत्या खाद्य पदार्थातून कांदा जवळपास अंतर्धान पावला आहे.

चांदवड तालुक्यातील ऊसवाड येथील बाळू आहेर यांनी दीड एकरमध्ये कांद्याची लागवड केली होती. नोव्हेंबरमध्ये ते काढणीवर आले असते. तत्पुर्वीच पावसात रोपे वाकडेतिकडे होऊन गेले. साधारण परिस्थितीत ५० ते ६० क्विंटलचे उत्पादन झाले असते. आता १० ते २० क्विंटल कांदे निघाले आणि दर असेच राहिले तरच लागवडीसाठी केलेला ४० हजार रुपयांचा खर्च भरून निघू शकेल, असे ते सांगतात. पावसाने केवळ पिकाचे नुकसान झाले नाही तर, उन्हाळ कांद्याची रोपे खराब केली. ६४२ हेक्टरवरील कांदा रोपवाटीकेचे नुकसान झाल्याचा कृषी विभागाचा अहवाल आहे.